# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2017-18/ना-हरकत/ 3076
दिनांक : 13 JAN 2017

विषय : **शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून राज्यात व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या/ अभ्यासक्रमाच्या नावात, जागेत बदल करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, को-एज्युकेशन करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. करीता शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत...**

संदर्भ : **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : अप्रुव्हल/12(11)/2016.(लोकसत्ता दिनांक : 2.1.2017)**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक 2017-18 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक 5.1.2017 ते दिनांक 4.2.2017 या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडुन अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर करणार आहेत, अशा संस्थांनी शासनामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातून परिषदेमार्फत निर्धारित व खाली नमूद कागदपत्रांसह, **दिनांक** 4.2.2017 **पुर्वी किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदमार्फत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापुर्वी** तसा स्वतंत्र प्रस्ताव (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस सादर केलेल्या ऑनलाईन प्रस्तावा व्यतिरिक्त) थेट या संचालनालयास सादर करावा. प्रस्ताव प्राप्त न झालेल्या/विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावाची / कागदपत्रांची या संचालनालयामार्फत दखल घेतली जाणार नाही व अशा संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येणार नाही ह्या बाबीची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी. तसेच सदर संदर्भाधीन जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून ज्या संस्थांनी उपरोक्तकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत संचालनालयास प्रस्ताव सादर केलेला असेल त्या संस्थांनी खालील नमूद कागदपत्र प्रस्तावासोबत जोडलेले आहेत याची शहानिशा करुन उर्वरित कागदपत्र तात्काळ या संचालनालयास पुर्वीच्या प्रस्तावाचा संदर्भ देवून त्यासोबत संचालनालयास सादर करावेत.

1. पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपांतरीत करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. इ. बाबत संबंधीत संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांची स्वाक्षरी असलेली संस्थेच्या ठरावाची मुळ प्रत.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, ...
आवक क्रमांक 554

2. पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत करणे, इ. बाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत. तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणेसाठी संबंधीत विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

3. अभ्यासक्रम / संस्था बंद करण्यासाठी संबंधीत अभ्यासक्रमांसाठी संयुक्त खात्यात मुदतठेव ठेवण्यात आली असल्यास सदर मुदतठेवींची साक्षांकित प्रत.

4. तसेच सदर पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत केल्यानंतर/ पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर केल्यानंतर प्रवेशित विद्यार्थी किंवा नेमणुक केलेले कर्मचारी यांचे पर्यायी समायोजन कसे करणार याबाबतची कार्यपध्दती नमूद करुन याबाबत काही न्यायालयीन प्रकरण उध्दवल्यास त्यास पूर्णपणे संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे 100 रु. च्या स्टँपपेपर वर संस्थेने केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

5. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण 2013/प्र.क्र.43/तांशि-4, दि. 21.8.2013 मध्ये संबंधीत प्रस्तावाकरीता विहीत केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत शासनास भरलेल्या पावतीची साक्षांकित छायाप्रत.

6. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणेबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 प्रमाणे आवश्यक कागदपत्रांसह संबंधीत विभागीय कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या तपासणीचा तपासणी अहवाल.

तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत (Non-Zero) घट करणे, व्दितीय पाळीतील पदविका अभ्यासक्रम बंद करणेबाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत या संचालनालयास प्रस्ताव सादर केले आहेत. अशा संस्थाना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या Approval Process Handbook 2017-18 मधील पृष्ठ क्रमांक 147 वरील 17.6 मध्ये अनुक्रमांक 4 मध्ये **"NOC shall not be required for closing of the second Shift or reduction in Intake of Course/ Programme by reduction in number of divisions."** असे नमूद केलेले असल्याने व्दितीय पाळीतील अभ्यासक्रम बंद करण्याबाबत तसेच ज्या अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता तुकडीने(**number of divisions**) कमी होत असेल अशा बाबतीत शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्यामुळे याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत या संचालनालयामार्फत शासनास शिफारस करण्यात येणार नाही ह्या बाबीची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
2. कार्यासन क्रमांक3 (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई (सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.)
3. निवडनस्ती.

पृष्ठांकन/तशिस/विकाना/शैवि/[illegible]2017/216
दिनांक:- 27 JAN 2017

प्रति,

प्राचार्य,सर्व पदवीका संस्था,
नागपूर विभाग,
नागपूर.

उपरोक्त पत्रात नमुद केल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

27/1/17
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर